दिनांक 18 / 10 / 2017

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि 17 / 10 / 2017 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (18) वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 3,800 /- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्याविरूध्द जिल्हयातील पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन. या मोहिमे अंतर्गत दिनांक 17 / 10 / 2017 रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत पो.स्टे गोरेगाव हदीत (01) ठिकाणी छापे टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचे देशीदारू 10 बॉटल कि.अं. 500 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन. आरोपी विरूध्द दारूबंदी कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत

**अपघात :-**

दिनांक 17 / 10 / 2017 रोजी फिर्यादी केशव भाउराव शिंदे यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम 324,504 भादवी प्रमाणे साई उपहार गृह झेंडा चौक वसमत येथे आरोपीताने फिर्यादीस कढाईचा धक्का कारणावरून थापड बुक्याने मारहान करून शिवीगाळ केली व लोखंडी सराटयाने फिर्यादीचे डावे डोळयाचे खाली जखमी केले या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करीत आहे.

पोलीस अधिक्षक हिंगोली